मौजा गोधणी, ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील स.क्र. ३४८ मधील आराजी १४.२८ हे.आर. पैकी २० एकर इतकी शासकीय जमीन भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित येणाऱ्या, सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांच्या अंतर्गत असलेल्या Institute of Driving Training and Research (IDTR) या संस्थेच्या उभारणीकरीता वार्षिक नाममात्र रू. १/- दराने भुईभाडे आकारुन ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने, नियमित <u>अटी व शर्तीवर, विशेष बाब म्हणून मंजूर करणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०१९/प्र.क्र.०१/ज-८.

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, १ ला मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ ऑगस्ट, २०१९

<u>संदर्भ</u> :- १. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.- जमीन/कार्या-८(१)/ सीआर ४३/१८/कावि-९४६, दि.११.१०.२०१८

२. संचालक, सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे क्र. DIR/१०३५/ ०६/ IDTR-Nagpur/ २१, दि.२३.०२.२०१८ चे पत्र.

३. प्रशासकीय प्रमुख, सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे दि.०१.०१.२०१९ चे पत्र.

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यामध्ये कुशल मोटार वाहन चालनास (Driving) निश्चितच प्रोत्साहन प्राप्त होऊन त्याव्दारे राज्यात अद्ययावत व सुरक्षित मोटार वाहन चालनाच्या (Driving) दृष्टीने प्रगती साधन्याच्या उद्देशाची पुर्तता करण्याकरीता Institute of Driving Training and Research (IDTR) या संस्थेची स्थापना करण्यासाठी मौजा गोधणी, ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील स.क्र. ३४८ मधील आराजी १४.२८ हे. आर. पैकी २० एकर इतकी शासकीय जमीन, **विनामूल्य (Free of Cost)** मंजूर करण्यासंदर्भात भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित येणाऱ्या सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांनी **संदर्भाधीन क्र. ३** च्या पत्रान्वये शासनास विनंती केली आहे.

त्यानुषंगाने मौजा गोधणी, ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील स.क्र. ३४८ मधील आराजी १४.२८ हे. आर. पैकी २० एकर इतकी शासकीय जमीन Institute of Driving Training and Research (IDTR) स्थापन करण्याकरीता सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांना मंजूर करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी **संदर्भाधीन क्र.१** च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता.

सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेव्दारे मौजा गोधणी, ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथे उभारावयाच्या Institute of Driving Training and Research (IDTR) या प्रस्तावित संस्थेमुळे राज्यामध्ये कुशल मोटार वाहन चालनास (Driving) निश्चितच प्रोत्साहन प्राप्त होऊन त्याव्दारे राज्यात अद्ययावत व सुरक्षित मोटार वाहन चालनाच्या (Driving) दृष्टीने प्रगती साधने शक्य होणार आहे. सदर बाब लक्षात घेता, मौजा गोधणी,

ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील स.क्र. ३४८ मधील आराजी १४.२८ हे. आर. पैकी २० एकर इतकी इतकी शासकीय जमीन, भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित येणाऱ्या सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांना Institute of Driving Training and Research (IDTR) या संस्थेची स्थापना करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या **कलम ३८ व ४०** अन्वये शासनास प्राप्त अधिकारांनुसार **३० वर्षांसाठी वार्षिक नाममात्र रू. १/- दराने भुईभाडे आकारून नियमित अटी व शर्तीवर भाडेपट्ट्याने** देण्याची व सदर भाडेपट्ट्याचे त्याच तत्वावर नुतनीकरण करण्याची तरतूद भाडेपट्ट्यात अंतर्भूत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. ह्या संदर्भात दि. ३० जुलै, २०१९ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत विचार विनिमय होऊन झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय :-

मौजा गोधणी, ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील स.क्र. ३४८ मधील आराजी १४.२८ हे. आर. पैकी २० एकर इतकी शासकीय जमीन, भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित येणाऱ्या सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांना Institute of Driving Training and Research (IDTR) या संस्थेची स्थापना करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या **कलम ३८ व ४०** अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार **३० वर्षांसाठी वार्षिक नाममात्र रू. १/- दराने भुईभाडे आकारुन नियमित अटी व शर्तीवर भाडेपट्ट्याने** देण्यास व सदर भाडेपट्ट्याचे त्याच तत्वावर नुतनीकरण करण्याची तरतूद भाडेपट्ट्यात अंतर्भूत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित येणाऱ्या सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांना Institute of Driving Training and Research (IDTR) या संस्थेची स्थापना करण्याच्या प्रयोजनाकरीता वार्षिक नाममात्र रुपये १/- या भुईभाड्याने मंजूर करण्यात आलेली सदर शासकीय जमीन किंवा तिचा कोणताही भाग (किंवा तिच्यातील कोणतेही हितसंबध) विक्री / देणगी देऊन / अदला बदल करुन / गहाण ठेऊन / पट्ट्याने देऊन / खाजगी-सार्वजनिक सहभाग तत्वावर किंवा बाह्य यंत्रणाद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरित करता येणार नाही. सदर जमिनीवर अथवा त्याच्या कोणत्याही भागावर अन्य व्यक्ती/ संस्था/ कंपनी इत्यादींचे कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण होतील अशा प्रकारे कोणताही आर्थिक व्यवहार अर्जदारास करता येणार नाही. तसेच शासनाच्या महसूल विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय सदर जमीनीचे पोटविभाजन करता येणार नाही.

२) सदर Institute of Driving Training and Research (IDTR) या संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी यांना भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित येणाऱ्या सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांनी सहयोगी करुन घेणे बंधनकारक राहील.

३) विषयांकित शासकीय जमीनीचा वापर केवळ मंजूर केलेल्या प्रयोजनासाठी करता येईल. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा अथवा त्याच्या कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरुपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पूर्वमान्यता आवश्यक राहील.

४) विषयांकित शासकीय जमिनीवर संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या विहित परवानगीने व मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास करणे बंधनकारक राहील. तसेच, या व्यतिरिक्त आवश्यकते प्रमाणे अन्य संबधित विभाग / शासकीय यंत्रणा यांची मान्यता / पूर्वपरवानगी / ना- हरकत घेणे देखील बंधनकारक राहील.

५) प्रस्तावित प्रयोजनाच्या व सुरक्षेच्या अनुषंगाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / सूचना या प्रकरणी उक्त संस्थेस बंधनकारक राहतील व त्यानुषंगाने आवश्यक खबरदारी / काळजी घेणे बंधनकारक राहील.

६) सदर जमिनीचा ताबा मिळाल्यापासून तीन वर्षाच्या आत बांधकामास सुरूवात करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियोजित वापर सुरू होईपर्यंत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

७) शासकीय जमीन मंजूरी संदर्भातील इतर नियमित अटी या ठिकाणी लागू राहतील.

८) सदर जमीन मंजूर करण्याबाबतच्या अटी व शर्तीचा भंग झाल्यास जमीन शासनाकडून परत घेण्यात येईल.

९) **विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर व जिल्हाधिकारी, नागपूर** यांना आवश्यक वाटतील अशा अन्य अटी व शर्ती विहित करण्याची मुभा राहील.

०२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६६/व्यय-०९/ २०१९, दि.१२.०२.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१९१४५१०९८२१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sharad Madhavrao Doke

Digitally signed by Sharad Madhavrao Doke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49a6844e93d7a1180c3226081e6f456ddf8d7b1bc67bc4bd78fa78029ab559db, cn=Sharad Madhavrao Doke
Date: 2019.08.20 19:30:53 +05'30'

(शरद डोके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.
७) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई -३२.
८) अपर सचिव (महसूल) यांचे वि.का.अ./ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई -३२.
९) प्रधान सचिव, (नगर विकास विभाग-१), मंत्रालय,मुंबई -३२.
१०) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
११) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) जिल्हाधिकारी, नागपूर.
१३) संचालक, सेंट्रल इंस्टिटयुट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे द्वारा जिल्हाधिकारी, नागपूर.
१४) मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य (१), मुंबई -३२.
१५) मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य (२), नागपूर.
१६) नगर विकास विभाग (नवि-९), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
१७) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
१८) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
१९) निवड नस्ती, कार्यासन ज-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२.